**L. A. BILL No. XIII OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३.

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

१९७५ चा महा. १६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, १ एप्रिल २०२३ रोजी अंमलात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २७अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (यात यापुढे, ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २७अ मधील,— १९७५ चा महा. १६.

(१) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क)(एक) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ याच्या कलम २ च्या खंड (द) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे लक्षणीय दिव्यांगत्व असणारी कोणतीही व्यक्ती ; किंवा २०१६ चा ४९.

(दोन) लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या बालकाचे आई-वडील किंवा पालक,

जर, अशा लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तीने किंवा बालकाने, उक्त अधिनियमाखालील किंवा त्यान्वये केलेल्या नियमांखालील प्रमाणित प्राधिकरणाने दिलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्र धारण केले असेल तर :

परंतु, अशी व्यक्ती किंवा, यथास्थिति, मालक, ती या खंडान्वये ज्या पहिल्या आकारणी वर्षासाठी सूट मिळण्याचा दावा करीत असेल त्या वर्षासंबंधात विहित प्राधिकरणाकडे उपरोक्त प्रमाणपत्र सादर करील :

परंतु आणखी असे की, व्यक्तीने किंवा, यथास्थिति, मालकाने, दिनांक १ एप्रिल २०२३ च्या लगतपूर्वी असलेल्या या कलमाच्या प्रयोजनार्थ, विहित प्राधिकरणाकडे यापूर्वीच प्रमाणपत्र सादर केले असेल तर तिला पुन्हा ते सादर करण्याची आवश्यकता असणार नाही. " ;

(२) खंड (ई) वगळण्यात येईल ;

(३) खंड (ग) वगळण्यात येईल.

**३.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या **अनुसूची एक** मधील, नोंद १ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :— सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

" १. वेतनदार व मजुरी मिळविणारे—

(एक) पुरुषांच्या बाबतीत, ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी,—

| | |
|---|---|
| (अ) सात हजार पाचशे रुपयांहून अधिक नाही ; | काही नाही. |
| (ब) सात हजार पाचशे रुपयांहून अधिक परंतु दहा हजार रुपयांहून अधिक नाही ; | दरमहा एकशे पंचाहत्तर. |
| (क) दहा हजार रुपयांहून अधिक ; | दरसाल दोन हजार पाचशे हे पुढील पद्धतीने देण्यात येतील :– (अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा दोनशे ; (ब) फेब्रुवारी महिन्यात तीनशे. |

(दोन) स्त्रियांच्या बाबतीत, ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी,—

| | |
|---|---|
| (अ) पंचवीस हजार रुपयांहून अधिक नाही ; | काही नाही. |
| (ब) पंचवीस हजार रुपयांहून अधिक ; | दरसाल दोन हजार पाचशे हे पुढील पद्धतीने देण्यात येतील :– (अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा दोनशे ; (ब) फेब्रुवारी महिन्यात तीनशे. ". |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३.]**

**[महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई